महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड लोकनेता

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंडे ●




मंगळवार २७ ऑक्टोबर.२०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email dainiklokneta.in@gmail.com वर्ष : ५ अंक : ६६ किंमत २ रुपये 7499615933

# सह्याद्रीच्या कुशीत निवडक सक्रियता का?

## लवासा आणि ‘अँबी व्हॅली सिटी’ वेळी आंदोलने का नाहीत? मंत्री मेघना बोर्डिकर मैदानात

भिमाशंकर परिसरात ६०० एकरावर जलविद्युत प्रकल्प साकारला जाणार आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरु झाली आहे. शिवसेना नेते आदित्य ठाकरे आणि अभिनेते सयाजी शिंदे यांनी या प्रकरणात सरकारवर टीका केली आहे. या प्रकरणात मंत्री मेघना बोर्डीकर यांनी सह्याद्रीच्या कुशीत निवडक सक्रियता का ? असा सवाल केला आहे. लव्हासा आणि ‘अँबी व्हॅली सिटी’ झाली तेव्हा आंदोलने झाली नाहीत, आता शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विद्युत प्रकल्प राबवला जात आहे तर त्याला विरोध का असा सवालच बोर्डीकर यांनी सोशल मीडियावर केला आहे. राज्य सरकारने भिमाशंकर परिसरात मोठा जलविद्युत प्रकल्प साकारण्याची घोषणा केली आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरु झाली आहे. या विरोधात आता विरोधी पक्षांनी आवाज उठवला आहे. आदित्य ठाकरे यांनी कर्जत येथे प्रकल्पस्थळी भेट देऊन या प्रकल्पाला विरोध केला आहे. या संदर्भात आता सरकारच्या बाजूने मंत्री मेघना बोर्डीकर मैदानात उतरल्या आहेत.

**लोणावळा परिसरात 10, 600 एकरवर ‘अँबी व्हॅली सिटी’ झाली, तेव्हा आंदोलन झालं नाही. तेव्हा निसर्ग तुमचा सोयरा नव्हता का? असाही सवाल मंत्री मेघना बोर्डिकर यांनी केला आहे.**

### मेघना बोर्डीकर यांची पोस्ट काय ?

सह्याद्रीच्या पोटात मुळशीतील २५ हजार एकरवर ‘लवासा’ झालं.लोणावळा परिसरात १०, ६०० एकरवर ‘अँबी व्हॅली सिटी’ झाली, तेव्हा आंदोलन झालं नाही. तेव्हा निसर्ग तुमचा सोयरा नव्हता का? असाही सवाल मंत्री मेघना बोर्डिकर यांनी केला आहे. कर्जत उरणसह भिमाशंकर परिसरात ६०० एकरवर जलविद्युत प्रकल्प होतोय. शेतकऱ्यांनाच त्याचा फायदा होणार आहे. कोळश्यावर तयार होणाऱ्या विद्युत निर्मितीवर हा निसर्गपूरक पर्याय आहे. निसर्गातच निसर्गपूरक प्रकल्प तयार होतोय, एकच धंदा, काहीही करून पायात पाय अडकवून पाडायचं! महाराष्ट्राला मागं खेचायचं... वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, महायुतीचा प्रकल्प असला की थयथया नाच रे... मोठे प्रकल्प = शांतता... छोटे प्रकल्प = आंदोलन??? विकास हवा की फक्त सिलेक्टिव्ह विरोध? सह्याद्री वाचवाच... विकासाला साथ द्या! @BJP4Maharashtra






# बीड जिल्ह्यामध्ये भीषण दुष्काळ, पाण्याचा प्रश्न व चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर.

**बीड जिल्ह्यामध्ये तात्काळ चारा छावण्या. व पाण्याचे टँकर ग्रामीण भागामध्ये चालू करा, सरपंच उपसरपंच संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष परमेश्वर नाना तळेकर यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी**

**बीड प्रतिनिधी .**
बीड जिल्ह्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात सध्याच्या पार्श्वभूमीवर दुष्काळ जाणवत आहे .ग्रामीण भागामध्ये पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आहे. जनावरांना ग्रामीण भागामध्ये चारा उपलब्ध नाही, पाणी प्यायला नाही .पाणी विकत घेण्याची वेळ ग्रामस्थावर आली आहे, बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी तात्काळ बीड जिल्ह्यामध्ये चारा छावण्या व पाण्याचे टँकर त्वरित ग्रामीण भागामध्ये चालू करण्यात यावे अशी मागणी, केतुरा गावचे विद्यमान सरपंच तथा सरपंच उपसरपंच संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष परमेश्वर नाना तळेकर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी केली आहे, कारण सध्या खूप मोठ्या प्रमाणात मराठवाडा मध्ये दुष्काळाचे सावट पाहायला मिळत आहे, लोकांना पाणी नाही ,खायला अन्नधान्य नाही, तरी दिवाळीमध्ये



राशन धारकांनी व सरकारने गोरगरिबांना दिवाळीच्या किराणा किट मोफत वाटप करण्यात याव्यात अशी मागणी सुद्धा तळेकर यांनी केली आहे, ग्रामीण भागामध्ये लवकरात लवकर पाण्याचे टँकर व चारा छावण्या चालू करण्यात यावी अशी मागणी आपल्या पत्राद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी केली आहे, लवकरात लवकर बीड जिल्ह्यातील गोरगरिबांना आधार द्यावा व या दुष्काळाच्या संकटापासून ग्रामस्थांना धीर द्यावा कारण खूप मोठ्या प्रमाणात या दुष्काळाच्या झळा या आपल्या बीड जिल्ह्याला जाणवत आहेत, तरी जिल्हा प्रशासनाने यावर योग्य तो पर्याय करून लोकांना धीर द्यावा अशी मागणी तळेकर यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे,

# राष्ट्रीय महामार्गावर अपघाताचा धोका वाढला



## ऊस वाहतूक ट्रॅक्टर चालकांच्या मनमानीमुळे

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**मुजीब खान: कन्नड**
राष्ट्रीय महामार्गावर ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टर काही चालक मोठ्या आवाजात ध्वनीक्षेपक वाजवतात मागून येणाऱ्या वाहनांना बाजू न देणे तसेच महामार्गावर वाहनांची चढा ओढ लावणे असे प्रकार करीत असल्याची तक्रारी आहे त बेशिस्तपणामुळे महामार्गावरील वाहन सारख्यांच्या सुरक्षेतेचा प्रश्न निर्माण झाला आहे पानपोई जवळ उड्डाण पुलाच्या सुरवातीला ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरची कारची समोरासमोर धडक झाली या अपघातात कालच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नाही अपघातामुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून सुमारे दोन तास वाहतूक ठप्प झाली होती महामार्गावर उड्डाणपुलाचे काम सुरू असल्याने या परिसरात वाहनांची मोठी वर्दळ असते त्यामुळे वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवून सावधगिरीने वाहन चालवावे असे आवाहन शहर पोलिसांनी केले आहे

# दुष्काळग्रस्त परिस्थितीत फायनान्स कर्ज वसुलीचा छळ

## छावा संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

**नायगाव प्रतिनिधी** नायगाव तालुक्यात दुष्काळामुळे खरीप पिके वाळून गेल्याने शेतकरी, शेतमजूर आणि कामगार आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा




परिस्थितीत मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या प्रतिनिधींकडून कर्जवसुलीसाठी धमकी, दबाव आणि मानसिक त्रास दिला जात असल्याच्या तक्रारींची प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी अखिल भारतीय छावा संघटनेचे नायगाव तालुकाध्यक्ष साई पाटील मोरे देगांवकर व साई पाटील मोकासदरेकर यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.नांदेड जिल्ह्यातील माळकौठा येथील आत्महत्येच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर कर्जदारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दुष्काळामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या कर्जदारांना बेकायदेशीर वसुली, धमकी, अपमानास्पद वागणूक किंवा मानसिक छळाला सामोरे जावे लागू नये, यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.संबंधित तक्रारींची चौकशी करून दोषी आढळणाऱ्या व्यक्ती व संस्थांवर लागू कायद्यानुसार कारवाई करावी, तसेच अशा घटनांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे.“निवेदनाची दखल घेऊन तातडीने कार्यवाही न झाल्यास वरिष्ठ प्रशासनाकडे लेखी तक्रारी करून उपलब्ध कायदेशीर मार्गाने पाठपुरावा करण्यात येईल,” असा इशाराही साई पाटील मोरे देगांवकर व साई पाटील मोकासदरेकर यांनी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

# दिग्रस येथे किरकोळ कारणावरून राडा वाहनाची तोडफोड करत तरुणाला बेदम मारहाण 70 हजारांचे नुकसान

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**प्रतिनिधी | दिग्रस**

वाहनाला कट लागल्याचा खोटा आरोप करत एका तरुणाने वाहनाची तोडफोड करून चालकाला दगड मारून जखमी केल्याची खळबळजनक घटना दिग्रस शहरातील भीमनगर भागात घडली आहे. या घटनेत वाहनाचे सुमारे ७० हजार रुपयांचे नुकसान झाले असून चालकाला जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मूळचे वाकडी , ता. चाळीसगाव, जि. जळगाव येथील रहिवासी व पेशाने सिव्हिल इंजिनिअर असलेले विवेक प्रकाश पाटील (वय २८) हे दिग्रस येथे आपल्या वाहन क्रमांक एम एच ०४ एफ एफ ८२३५ ने आले होते. २४





ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेच्या सुमारास भीमनगर येथील एका पानटपरीवर पाणी बॉटल घेण्यासाठी ते थांबले होते. त्यावेळी तिथे एका बुलेटवर आलेल्या प्रदीप विजय चव्हाण (वय २७, रा. फुलउमरी, ता. मानोरा) याने, “तुझ्या वाहनाने माझ्या बुलेटला ठोस मारली व माझे नुकसान केले,” असा जाब विचारत वाद घातला. विवेक यांनी वाहनाचा कोणताही धक्का लागला नसल्याचे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला; मात्र आरोपीने काहीही न ऐकता विवेक यांच्या वाहनाच्या सर्व काचा फोडून सुमारे ७० हजार रुपयांचे नुकसान केले. एवढ्यावरच न थांबता, विवेक हे भांडण सोडवण्यासाठी मध्यस्थी करत असताना आरोपीने त्यांच्या डाव्या हाताच्या करंगळीवर दगड मारून त्यांना जखमी केले तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. या झटापटीदरम्यान फिर्यादीच्या हातातील ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी कुठेतरी गहाळ झाली आहे.

यावप्रकरणी विवेक पाटील यांच्या तक्रारीवरून दिग्रस पोलीस ठाण्यात आरोपी प्रदीप चव्हाणविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस कॉन्स्टेबल शैलेश झंझाड करत आहेत.

बीड
लोकनेता
संपादक: ज्ञानेश्वर मुंडे
GOOD MORNING

## दुष्काळाच्या विळख्यात बीड जिल्हा; शेतमजूर, ऊसतोड कामगार आणि एकल महिलांच्या मदतीसाठी 'आझाद क्रांती कामगार युनियन' आक्रमक

### गेवराई शहरासह जिल्ह्यातील 11 तालुक्यांत परिस्थिती बिकट; तातडीने उपाययोजना करण्याची निवेदनाद्वारे मागणी



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**बीड विजय रोडे**

गेवराई :-ऑक्टोबर २६ खरीप २०२६ च्या हंगामात बीड जिल्ह्यात पावसाने दिलेल्या ओढ मुळे अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्य शासनाने जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये ' लागू करून दुष्काळ जाहीर केला असला, तरी अद्याप तळागाळातील असंघटित कामगार, शेतमजूर, बांधकाम कामगार आणि ऊसतोड कामगारांपर्यंत कोणतीही ठोस मदत पोहोचलेली नाही. या पार्श्वभूमीवर, 'आझाद क्रांती कामगार युनियन, महाराष्ट्र राज्य' च्या वतीने प्रशासनाला निवेदन देऊन तातडीने मदत कार्य सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पावसाच्या मोठ्या तूटीमुळे कापूस, सोयाबीन, तूर आदी खरीप पिके पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. परिणामी, शेतीवर अवलंबून असलेल्या भूमिहीन शेतमजूर आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांचा हक्काचा रोजगार हिरावला गेला आहे.

वस्त्यांमध्ये उपासमार आणि कर्जाचा डोंगर

आझाद क्रांती कामगार युनियनच्या प्रतिनिधींनी गेवराई शहरातील भटके विमुक्त, आदिवासी, दलित, अल्पसंख्याक आणि भूमिहीन कामगारांच्या वस्त्यांना भेटी दिल्या. या दौऱ्यात अन्नसुरक्षा, पिण्याचे पाणी, रोजगार, आरोग्य आणि मुलांचे शिक्षण यांसारख्या अत्यंत मूलभूत आणि गंभीर अडचणी समोर आल्या आहेत. रोजगार नसल्यामुळे या कुटुंबांवर हंगामी स्थलांतराची वेळ आली असून, बालकामगारांचा धोका आणि महिलांच्या शोषणाची शक्यता वाढली आहे. त्यातच मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या कर्जाचा ताण असह्य झाल्याने विशेषतः एकल व गरीब महिलांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे.

युनियनने निवेदनात मांडलेल्या ५ प्रमुख मागण्या:

१. अन्नसुरक्षा किटचे वाटप: हतबल झालेल्या शेतमजूर, बांधकाम कामगार, ऊसतोड कामगार, भटके विमुक्त, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक, एकल महिला आणि भूमिहीन कुटुंबांना ज्वारी, गहू, डाळी, तेल, मसाले व पोषक आहाराचा समावेश असलेले रेशन किट तातडीने मोफत द्यावे.

२. अन्नछत्र सुरू करा: कामगारांच्या वस्त्या, खेडी गावे आणि शहरातील निर्वासित/स्थलांतरित कुटुंबांच्या वस्त्यांमध्ये उपासमार व कुपोषण टाळण्यासाठी शासनाने तात्काळ अन्नछत्र (कम्युनिटी किचन) सुरू करावे.

३. तात्काळ रोजगार उपलब्ध करा: रोजगार हमी योजनेंतर्गत (रोहयो) कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक कामगाराला १५ दिवसांच्या आत काम द्यावे. यासाठी तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, जलसंधारण, वृक्षारोपण, रस्ते दुरुस्ती यांसारख्या सार्वजनिक कामांचे नियोजन करावे.

४. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था: सर्व खेडी आणि शहरातील कामगार वस्त्यांमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची निश्चित व्यवस्था करावी. पाणी टंचाई असलेल्या वस्त्यांना नियमित टँकरपुरवठा, पाण्याचे टाके व आवश्यक असल्यास बोरवेल/पाणीपुरवठा योजना उपलब्ध कराव्या.

५. मोफत आरोग्य सेवा: दुष्काळामुळे निर्माण होणाऱ्या आजारांचा मुकाबला करण्यासाठी लहान मुले, महिला, वृद्ध आणि आजारी व्यक्तींसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे, रुग्णवाहिका सेवा, आवश्यक औषधे व उपचार मोफत उपलब्ध करून द्यावेत.

# जातीसाठी एकत्र आलो, पक्षासाठी शक्ती दाखवली; पण मातीसाठी एकत्र कधी होणार?

## दसरा मेळाव्यांतून शक्तिप्रदर्शन झाले; मात्र शेतकरी, बेरोजगार तरुण आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर एकजुटीची प्रतीक्षा कायम!

महाराष्ट्राच्या राजकारणात दसरा मेळावे म्हणजे केवळ भाषणांचे व्यासपीठ नाही, तर शक्तिप्रदर्शनाची मोठी संधी! कुठे समाजाच्या अस्मितेचा आवाज घुमला, कुठे पक्षनिष्ठेचे प्रदर्शन झाले, तर कुठे नेतृत्वाभोवती समर्थकांची गर्दी जमली. मात्र या सगळ्या गर्दीत एक प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात कायम राहिला आहे— जातीसाठी एकत्र येतो, पक्षासाठी एकत्र येतो; मग आपल्या मातीसाठी एकत्र कधी येणार?



**महाराष्ट्र | विशेष लेख**

दसरा मेळावे पार पडले. व्यासपीठांवरून विचार मांडले गेले, राजकीय आरोप-प्रत्यारोप झाले, समाजाच्या प्रश्नांवर भूमिका मांडल्या गेल्या आणि समर्थकांनी आपल्या नेत्यांच्या नावाने घोषणा दिल्या. कुणी समाजाच्या हक्कांसाठी एकजूट दाखवली, तर कुणी पक्षाची ताकद सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. लोकशाहीत अशा सभा आणि मेळाव्यांना महत्त्व आहे. समाजाच्या भावना व्यक्त होणे आणि राजकीय भूमिका मांडणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे.

परंतु या सगळ्या शक्तिप्रदर्शनानंतर आता एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो— या एकजुटीचा उपयोग सर्वसामान्य माणसाचे आयुष्य बदलण्यासाठी किती होणार? जात एकत्र आणते, पक्ष गर्दी जमवतो; मग मातीसाठी कोण उभे राहणार?

महाराष्ट्र हा संतांची, समाजसुधारकांची आणि कष्टकरी शेतकऱ्यांची भूमी आहे. याच मातीत महापुरुषांनी समाजाला समतेचा, बंधुभावाचा आणि माणुसकीचा संदेश दिला. मात्र आज अनेकदा जातीय अस्मिता आणि पक्षीय निष्ठा या सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी दिसतात. समाजाने आपल्या हक्कांसाठी संघटित होणे चुकीचे नाही; राजकीय पक्षांच्या विचारांशी जोडले जाणेही गैर नाही. प्रश्न आहे तो प्राधान्यक्रमाचा!

आपली जात, आपला समाज आणि आपला पक्ष महत्त्वाचा असू शकतो; पण ज्या जमिनीवर आपण जन्मलो, ज्या मातीतून आपले अन्न पिकते आणि ज्या राज्याच्या साधनसंपत्तीवर आपले भविष्य उभे आहे, त्या महाराष्ट्राच्या प्रश्नांसाठी आपण किती वेळा एकत्र येतो?

शेतकऱ्याला पीकविम्यासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. कधी अतिवृष्टी, कधी दुष्काळ, तर कधी बाजारभावाच्या अनिश्चिततेने त्याचे आर्थिक गणित कोलमडते. शेतमालाला योग्य भाव मिळावा, पाणी मिळावे, सिंचनाचे प्रकल्प पूर्ण व्हावेत आणि शेती परवडणारी व्हावी, यासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्रित आवाज किती वेळा उठतो?

हा प्रश्न केवळ शेतकऱ्यांचा नाही; हा संपूर्ण समाजाच्या भविष्याचा प्रश्न आहे.

तरुणांच्या हातात पदव्या; पण रोजगारासाठी संघर्ष

आजचा तरुण शिक्षण घेतो, पदव्या मिळवतो, स्पर्धा परीक्षांची तयारी करतो; पण त्याच्या हाताला काम मिळेलच याची खात्री नाही. ग्रामीण भागातील अनेक तरुण रोजगाराच्या शोधात शहरांकडे धाव घेतात. काहींना मिळेल ते काम स्वीकारावे लागते, तर काहींना कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी पारंपरिक व्यवसाय किंवा शेतीवर अवलंबून राहावे लागते.

दसरा मेळाव्यांमध्ये तरुणांच्या भविष्याचा प्रश्न चर्चिला जात असेल, तर त्याचे रूपांतर ठोस कृतीत होणे आवश्यक आहे. रोजगारनिर्मिती, उद्योगांची उभारणी, कौशल्यविकास, रिक्त पदांची भरती आणि ग्रामीण भागातील संधी यांसाठी एकत्रित दबाव निर्माण झाला पाहिजे.

तरुणांनी केवळ नेत्यांच्या घोषणा देण्यासाठी नव्हे, तर आपल्या भविष्याचा हिशेब मागण्यासाठीही एकत्र आले पाहिजे.

जातीच्या नावावर एकजूट; पण पाण्यासाठी आणि शेतमालाच्या भावासाठी?

गावोगावी जातीय किंवा पक्षीय आवाहन झाले की माणसे एकत्र येतात. सभा भरतात, गर्दी जमते आणि शक्तीचे दर्शन घडते. पण गावातील पाणीटंचाई, रस्त्यांची दुरवस्था, शाळांमधील सुविधांचा अभाव, आरोग्यसेवेची कमतरता आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी यांवर सामूहिक लढा उभारण्याची वेळ आली की तीच एकजूट किती टिकते?

गावातील पाणीप्रश्न हा कोणत्याही एका जातीचा नसतो. रस्त्यांची समस्या पक्ष पाहून निर्माण होत नाही. महागाईचा फटका जात किंवा पक्ष विचारून बसत नाही. बेरोजगारी कोणत्या समाजातील तरुणाला त्रास देईल, हेही त्याच्या हातातील नसते.

मग या समान प्रश्नांवर समाजाने एकत्र येण्यास अडथळा कोणता?

मतभेद असू द्या, विचार वेगळे असू द्या, राजकीय पक्ष वेगळे असू द्या; पण गावाचा विकास, शेतीचे प्रश्न, शिक्षण, रोजगार आणि पाणी या विषयांवर एकमत होऊ शकत नाही का?

मेळाव्यांची खरी ताकद घोषणांत नव्हे, परिणामांत!

दसरा मेळाव्यांना लाखोंची गर्दी जमली किंवा एखाद्या पक्षाने आपली ताकद दाखवली, एवढ्यावर समाजाचे प्रश्न सुटत नाहीत. अशा मेळाव्यांमधून मांडल्या जाणाऱ्या मागण्यांचे पुढे काय होते, याचा हिशेबही जनतेने घेतला पाहिजे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस पाठपुरावा झाला का? बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या का? ग्रामीण भागातील पाणी आणि सिंचनाच्या समस्या कमी झाल्या का? शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा सुधारल्या का? सामान्य माणसाला न्याय मिळवण्यासाठी होणारी धावपळ कमी झाली का?

हे प्रश्न कोणत्याही एका नेत्याला किंवा पक्षाला उद्देशून नाहीत. हे प्रश्न संपूर्ण राजकीय व्यवस्थेला आणि समाजालाही विचारण्याची गरज आहे.

नेत्यांनी भाषणांतून जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडावी; कार्यकर्त्यांनी त्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पाठपुरावा करावा आणि नागरिकांनीही भावनिक घोषणांपलीकडे जाऊन कामाचा हिशेब मागावा. तेव्हाच लोकशाहीतील मेळाव्यांचे सामाजिक मूल्य वाढेल.

आता वेळ आहे मातीच्या प्रश्नांवर एकत्र येण्याची!

माती म्हणजे केवळ शेतातील जमीन नव्हे. माती म्हणजे आपले गाव, आपला प्रदेश, आपली संस्कृती, आपले पाणी, आपले अन्न आणि आपल्या पुढच्या पिढ्यांचे भविष्य. ही माती समृद्ध असेल, तर समाज समृद्ध होईल. शेती सक्षम असेल, तर ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होईल. तरुणांना रोजगार मिळेल, तर कुटुंबांचे भविष्य सुरक्षित होईल.

म्हणूनच जातीय अस्मिता जपताना सामाजिक सलोखा जपणे, पक्षीय निष्ठा ठेवताना जनहिताला प्राधान्य देणे आणि आपल्या नेत्यांना पाठिंबा देतानाच त्यांच्याकडून विकासाचा हिशेब मागणे, ही काळाची गरज आहे.

जातीसाठी एकत्र येणे चुकीचे नाही; पक्षासाठी एकत्र येणेही चुकीचे नाही. पण या एकजुटीचा उपयोग मातीच्या प्रश्नांसाठी झाला नाही, तर त्या शक्तिप्रदर्शनाचा सामान्य माणसाला नेमका फायदा काय?

दसरा मेळावे संपले, घोषणा विरल्या आणि गर्दी आपापल्या घरी परतली. आता प्रश्न आहे तो पुढच्या कृतीचा. शेतकऱ्याच्या शेताला पाणी, पिकाला योग्य भाव, तरुणाच्या हाताला काम आणि गावाला विकास मिळवून देण्यासाठी हीच एकजूट रस्त्यावर, कार्यालयांत आणि निर्णयप्रक्रियेत दिसणार का?

कारण महाराष्ट्राला केवळ गर्दीची ताकद नको आहे; महाराष्ट्राला प्रश्न सोडवणारी एकजूट हवी आहे.

शेवटी एकच सवाल— जातीसाठी एकत्र आलो, पक्षासाठी एकत्र आलो; आता आपल्या मातीसाठी, आपल्या शेतकऱ्यासाठी आणि आपल्या तरुणांच्या भविष्यासाठी एकत्र कधी येणार?

**... परमेश्वर सोळंके पत्रकार......**

## उदगीर ग्रामीण पोलिसांची पुन्हा धमाकेदार कामगिरी !!

# 12 तासांत शोधून काढली जनावर चोरी!!

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**उदगीर (एल पी उगीले)** उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यासाठी प्रभारी अधिकारी म्हणून ज्येष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप गाडे रुजू झाल्यापासून एका नंतर एक उत्कृष्ट तपास आणि अवैध धंद्याला लगाम घालण्यात ग्रामीण पोलीस यशस्वी झाले आहेत. उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडलेल्या जनावर चोरीच्या गुन्ह्याचा पोलिसांनी अवघ्या काही तासांत छडा लावून एक आदर्श निर्माण केला आहे.

वास्तविक पाहता सद्यस्थितीत जनावर चोरीचा गुन्हा घडला की, त्या जनावराला लगेच कत्तल करण्यासाठी खाटकाकडे विकले जात असल्याची चर्चा होत होती. त्यामुळे जनावर चोरीचा गुन्हा शोधणे आणि तेही तातडीने हे मोठे कौशल्यच म्हणावे लागेल.

उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण ज्येष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आपला एक आदर्श ठसा निर्माण केला आहे. या जनावर चोरीच्या गुन्ह्यात देखील एका आरोपीला अटक करून चोरीस गेलेली तिन्ही जनावरे हस्तगत करण्यात आली आहेत. उदगीर ग्रामीण पोलिसांच्या या धडाकेबाज कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.




फिर्यादी प्रकाश मनोहर चव्हाण (वय 32, रा. गणेशनगर, येणकी रोड, उदगीर) यांच्या राहत्या घरासमोरील गोठ्यातून अज्ञात चोरट्याने दोन मुरा जातीच्या वगारी आणि एक मुरा जातीचा हालगट अशी एकूण तीन जनावरे चोरून नेली होती. ही घटना दिनांक 24 ऑक्टोबर रोजी सकाळी 11.00 ते 25 ऑक्टोबर रोजी पहाटे 3.00 वाजेच्या दरम्यान घडली होती. चोरीस गेलेल्या जनावरांची एकूण किंमत सुमारे 70,000 रुपये आहे. याबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक 760/2026, कलम 303(2) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवली. गोपनीय बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे पोलिसांनी संशयिताचा शोध घेतला. अखेर पोलिसांनी रात्रीतूनच गुन्ह्याचा छडा लावत एका आरोपीस अटक केली. त्याच्याकडून चोरीस गेलेली तिन्ही जनावरे सुखरूप हस्तगत करण्यात आली आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली, उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक दिलीप गाडे यांच्या नेतृत्वात गुन्हे



प्रकटीकरण शाखेचे नामदेव चेवले, बजरंग गज्जलवार, अभिजीत लोखंडे, संदीप केंद्रे, सचिन नाडागडे , राजकुमार डबेटवार, राजकुमार देवडे आणि त्यांच्या साथीदारांनी याप्रकरणी मोलाची कामगिरी केली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस अंमलदार केंद्रे हे करीत आहेत.

## नांदेड जिल्ह्यासाठी 28 ऑक्टोबरला 'येलो अलर्ट' विजांच्या कडकडाटासह पावसाची




**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नांदेड जिल्हा प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर** नांदेड, दि. 26 : प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. 28 ऑक्टोबर 2026 रोजी एक दिवसासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या दिवशी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी 30 ते 40 किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची तसेच विजांच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात. नागरिकांनीही हवामानाची स्थिती लक्षात घेऊन सतर्क राहावे आणि वीज, वादळी वारे व पावसाच्या कालावधीत सुरक्षिततेच्या उपाययोजनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

विजा चमकत असताना ही खबरदारी घ्या

विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्यास अनावश्यकपणे घराबाहेर पडणे टाळावे. मोकळ्या जागेत असताना जवळपास सुरक्षित इमारत उपलब्ध नसल्यास सखल जागेचा आश्रय घ्यावा आणि गुडघ्यात डोके घालून सुरक्षित स्थितीत बसावे. घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्यावा. बाल्कनी, छत किंवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नये. घरातील विद्युत उपकरणे तात्काळ बंद करावीत. तारांचे कुंपण, विजेचे खांब आणि अन्य लोखंडी वस्तूंपासून दूर राहावे. पाण्यात असल्यास तात्काळ पाण्याबाहेर यावे. वीज पडण्याचा धोका असताना हे टाळा घरातील लँडलाइन दूरध्वनीचा वापर करू नये. शॉवरखाली अंघोळ करू नये तसेच बेसिनचे नळ, पाण्याच्या पाइपलाइनला स्पर्श करू नये. वीज चमकत असताना विद्युत उपकरणांचा वापर टाळावा. विजांच्या कडकडाटासह वादळी वारे सुरू असताना लोखंडी संरचनेच्या तंबूत किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नये. उंच झाडाखाली आसरा घेऊ नये. धातूच्या उंच मनोऱ्यांजवळ उभे राहू नये. घरात असताना उघड्या दारातून किंवा खिडकीतून वीज पडताना पाहू नये. अशा ठिकाणी उभे राहणेही धोकादायक ठरू शकते.

नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत हवामानविषयक सूचनांकडे लक्ष द्यावे. आपत्कालीन परिस्थितीत संबंधित यंत्रणेशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# हदगावच्या 11 कोटींच्या कामाची चौकशी करा! दुष्काळात रस्त्यावर पाण्याची उधळपट्टी का?

## सा.बां.कार्यालय हदगांव समोर बुधवार,दिं. 28 ऑक्टोबर 2026 रोजी शेतकरी संघटना नांदेड जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील बाभळीकर उपोषणाला बसणार!

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**हदगांव। चंद्रकांत भोरे**
हदगाव शहरात सुरू असलेल्या सुमारे ११ कोटी रुपयांच्या कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. या संदर्भात यापूर्वी संबंधित विभागाला निवेदन देऊनही कामाची योग्य शहानिशा न करता काम सुरूच असल्याचा आरोप शेतकरी संघटना नांदेड जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील बाभळीकर यांनी केला आहे.
एकीकडे दुष्काळाचे सावट गडद होत असताना शेतकऱ्यांच्या बोरिंग मशीनवर बंदी किंवा निर्बंध लादले जात आहेत. शेतकऱ्यांना पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्याचे आवाहन केले जात आहे. मात्र, हदगाव शहरात सुरू असलेल्या कामासांठी खुलेआम रस्त्यावर पाणी टाकले जात असल्याचे चित्र दिसत असेल, तर हा दुजाभाव कशासाठी?



शेतकऱ्यांसाठी एक नियम आणि सा.बां. विभागासाठी दुसरा नियम आहे काय? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.
यापूर्वी निवेदन देऊनही संबंधित कामाची स्वतंत्र तांत्रिक तपासणी का करण्यात आली नाही? कामाच्या गुणवत्तेची जबाबदारी कोणाची? दुष्काळाच्या काळात रस्त्यावर पाणी टाकण्यास परवानगी आहे का? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने द्यावीत, अशी मागणी करण्यात येत आहे.
या प्रकरणी आता केवळ निवेदन देऊन थांबणार नसल्याची भूमिका घेत शेतकरी संघटना नांदेड जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील बाभळीकर हे बुधवार, दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी, हदगाव येथील सा.बां. कार्यालयासमोर उपोषणाला बसणार आहेत. चौकशी होईपर्यंत लढा सुरूच राहणार! असल्याचे सांगितले.
सुमारे ११ कोटी रुपयांच्या कामाची निष्पक्ष तांत्रिक तपासणी करावी, यापूर्वी दिलेल्या निवेदनावर झालेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी, कामाच्या गुणवत्तेतील त्रुटी आढळल्यास जबाबदारांवर नियमानुसार कारवाई करावी आणि दुष्काळाच्या काळात पाण्याचा अपव्यय होत असल्यास त्याची चौकशी करावी, या मागण्यांसाठी उपोषण करण्यात येणार आहे.
“शेतकऱ्यांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असताना सार्वजनिक कामांमध्ये पाण्याचा अपव्यय सहन केला जाणार नाही. जनतेच्या पैशातून होणाऱ्या कामाची गुणवत्ता तपासणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. यापूर्वी निवेदन देऊनही दखल घेतली जात नसेल, उपोषणाला बसणार असल्याची सांगितले. संबंधित कामाची निष्पक्ष चौकशी होऊन सत्य जनतेसमोर आलेच पाहिजे,” अशी भूमिका बालाजी पाटील बाभळीकर यांनी घेतली आहे.

# दिग्रसमध्ये भीषण अपघात

## ट्रॅक्टर अंगावरून गेल्याने 25 वर्षीय चालकाचा जागीच मृत्यू





**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**दिग्रस -** शहरातील आरोग्यधाम हॉस्पिटलजवळ सुरू असलेल्या पाण्याच्या टाकीच्या बांधकामावर सोमवारी सकाळी घडलेल्या भीषण अपघातात ट्रॅक्टरचे चाक डोक्यावरून गेल्याने चालक रोहित गजानन पवार (वय २५, रा. रुई तलाव) याचा जागीच मृत्यू झाला.
अनियंत्रित ट्रॅक्टरने लगतच्या चहाच्या कँटीनला जोरदार धडक दिली. या धडकेत कँटीनचे पत्रे तुटून मोठे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवला. याप्रकरणी दिग्रस पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून ठाणेदार वैजनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. तरुण वयात मुलाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# माधव धडेकर यांची व्हॉईस ऑफ मीडियाच्या तालुका अध्यक्षपदी बिनविरोध निवड

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**नायगाव प्रतिनिधी**
................................
व्हॉईस ऑफ मीडिया(VOM ) इंटरनॅशनल फोरमच्या नायगाव तालुका अध्यक्षपदी माधव धडेकर यांची तर मिलिंद बच्छाव यांची उपाध्यक्ष पदी तसेच कार्यध्यक्ष पदी माधव बैलकवाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून बैठकीत नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्षपदी नागेश कल्याण,जिल्हा कार्याध्यक्षपदी गजानन चौधरी, तर जिल्हा उपाध्यक्षपदी गंगाधर ढवळे यांची निवड करण्यात आली.

नायगाव पंचायत समितीच्या लोकनेता कै. बळवंतराव पाटील चव्हाण सभागृहात आयोजित तालुका बैठकीत व्हॉईस



ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमचे नांदेड जिल्हाध्यक्ष तुकाराम पाटील सावंत यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करून त्यांच्या स्वाक्षरीने नियुक्तीपत्र देऊन बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले.या बैठकीत जिल्हा आणि तालुका पातळीवरील संघटनात्मक कामकाजासंदर्भात चर्चा करण्यात आली.
पत्रकारांचे प्रश्न, त्यांचे हक्क, सुरक्षितता आणि विविध अडचणी सोडविण्यासाठी संघटनात्मक पातळीवर प्रयत्न करण्याची आवश्यकता या पार्श्वभूमीवर नव्या पदाधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जिल्हा आणि तालुका कार्यकारिणीच्या माध्यमातून पत्रकारांशी समन्वय वाढविणे, त्यांच्या समस्या संघटनेच्या व्यासपीठावर मांडणे आणि संघटनेचे कार्य अधिक व्यापक करणे, यासाठी नवनियुक्त पदाधिकारी काम करतील, अशी अपेक्षा जिल्हा अध्यक्ष तुकाराम पाटील सावंत व्यक्त केले आहे.
या बैठकीला व्हॉईस ऑफ मीडियाचे आरोग्य विंग विभागाचे जिल्हाध्यक्ष संजय धरमुरे, महानगराध्यक्ष सूर्यकुमार यन्नावार, प्रकाशभाऊ हणमंते, प्रल्हाद भंडारे, नागोराव बंडे, करीम चाऊस, केरबा रावते, संभाजी भोपाळकर,अनिल ढवळे,प्रकाश कांबळजकर,चंद्रकांत पवार, बालाजी लामतुरे, गंगाधर टोकलवाड, शिदोधन ढवळे,साहेब महिपाळे, अनिल तोडे, रउफ शेख, गौतम एडके, क्रांतीकिरण ढवळे,मधुकर जवळे, प्रल्हाद भालेराव, गजानन खुणे, अविनाश वाघमारे , रामप्रसाद पालनवार,प्रल्हाद वारघडे, रणजीत वाघमारे औराळकर,यांच्यासह नायगाव तालुक्यातील व्हॉईस ऑफ मीडियाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गावासाठी मैदान हा ग्रामस्थांचा हक्क : महेंद्रशेठ घरत



## उरण प्रीमियर लीगचे महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते उद्घाटन!

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**उरण विठ्ठल ममताबादे**
“क्रिकेटचा मी निस्सीम चाहता आहे,पण आज तरुणांना खेळण्यासाठी मैदानेच नाहीत. ही गावोगावची खूप मोठी शोकांतिका आहे. गावासाठी मैदान हा ग्रामस्थांचा मूलभूत हक्क आहे. तो मिळालाच पाहिजे. तो मिळवण्यासाठी एक होणे ही काळाची गरज आहे. गावाच्या भल्यासाठी तरुण पेटून उठले तर काहीही अशक्य नाही. अशा कामात मी सदैव आपल्या पाठीशी आहे. आजही मी फोर्टी प्लसचा कॅप्टन आहे. मी अनेक गावांना मैदाने मिळवून दिली. जमिनी आपल्या आहेत, त्यावर हक्क आपलाच आहे. त्यासाठी तरुणांची एकजूट महत्त्वाची आहे. गावाच्या विकासासाठी राजकीय चपला बाजूला ठेवा, मी बघा शेलघर कसे बनवले आहे. स्वतः रस्त्यावर उतरून गावचा विकास केला. मला तरुणांकडून हेच अपेक्षित आहे.” असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत महानगर येथे म्हणाले.
उरण प्रीमियर लीगच्या सहाव्या पर्वाचे सोमवारी (ता. २६) महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते मानघर येथील छाया रिसॉर्ट येथे उद्घाटन झाले. यावेळी महेंद्रशेठ घरत बोलत होते. यावेळी शेकाप नेते दीपक मढवी, विशाल पाटील, मध्य प्रदेशच्या मऊगंज येथील पतुलखी छत्रपाल सिंहच्या सरपंच अनुराधा साकेत, राजेंद्र भगत, आयोजक अतुल मढवी, कल्पेश पाटील उपस्थित होते. सुप्रसिद्ध सूत्रसंचालक नितेश पंडित यांनी उत्तम असे सूत्रसंचालन केले.

# 'धाकले पंढरपूर' शेळगावमध्ये 45 वर्षांची परंपरा खंडीत; चेअरमन पद कायमचे रद्द!

**दै. लोकनेता न्यूज नेटवर्क**
**इंदापूर ता. प्रति : राहुल जाधव**

इंदापूर: ‘धाकले पंढरपूर’ म्हणून प्रसिद्ध असलेल्या पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील शेळगाव येथील प्रसिद्ध वार्षिक यात्रा आता अवघ्या काही दिवसांवर आली आहे. या यात्रेच्या पार्श्वभूमीवर आज, २६ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या यात्रा कमिटीच्या बैठकीत एक अत्यंत अभूतपूर्व आणि ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. तब्बल ४५ वर्षांपासून चालत आलेली चेअरमन पदाची परंपरा आजपासून म्हणजे ह्या वर्ष्यापासून कायमची बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.
आज झालेल्या यात्रा कमिटीच्या बैठकीत चेअरमन पदाच्या निवडीदरम्यान हा महत्त्वाचा प्रस्ताव मांडण्यात आला, याला उपस्थित सर्व सदस्यांनी आणि ग्रामस्थांनी बहुमताने मंजुरी



दिली. त्यानुसार, या ऐतिहासिक निर्णयाची घोषणा करताना गावचे ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ ॲड. लक्ष्मणराव शिंगाडे यांनी कमिटी व समस्त शेळगाव ग्रामस्थांच्या वतीने अधिकृत माहिती दिली कि, “गेल्या ४५ वर्षांपासून यात्रा कमिटीमध्ये चेअरमन पद अस्तित्वात होते. परंतु, गावातील एकोपा अधिक दृढ करण्यासाठी आणि यात्रेचे नियोजन सामूहिक जबाबदारीने करण्यासाठी चालू वर्षापासून हे चेअरमन पद कायमचे रद्द करण्यात येत आहे.”
शेळगावच्या इतिहासामध्ये सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल असा हा निर्णय असून, लोकशाही मार्गाने आणि एकजुटीने घेतलेल्या या निर्णयाचे संपूर्ण तालुक्यातून कौतुक होत आहे. चेअरमन पदाच्या मानपानावरून होणारे वाद टाळून ‘धाकले पंढरपूर’ची यात्रा अधिक भक्तीमय आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पाडण्यासाठी गावाने घेतलेला हा निर्णय इतर गावांसाठीही आदर्श ठरणारा आहे.
यावेळी उपस्थित सर्व प्रतिष्ठित नागरिक, प्रगतशील बागायतदार, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ तसेच मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग उपस्थित होता.

# बामणी फाटा मार्केटमध्ये व्यापाऱ्यांचा रास्ता रोको; PMPL-RSVCPL कंपनीच्या विरोधात संताप!



**लोकनेता न्युज नेटवर्क**
**हदगांव । चंद्रकांत भोरे**
हदगाव तालुक्यातील प्रमुख बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बामणी फाटा येथील मुख्य चौकात PMPL-RSVCPL (JV) कंपनीच्या विरोधात सर्व व्यापाऱ्यांनी एकत्र येत तब्बल एक तास रास्ता रोको आंदोलन केले.
नांदेड–वर्धा रेल्वे लाईनच्या कामासाठी कंपनीच्या कॅम्पमधून मोठ्या प्रमाणात हायवा टिप्परची वाहतूक सुरू आहे. या वाहनांमुळे बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून दुकानांमध्ये धुळीचे थर साचत आहेत. तसेच रस्त्यावर खड्डे पडले असून कंपनीकडून पाणी फवारणी, मुरूम व गिट्टी टाकण्याची मागणी करूनही दुर्लक्ष होत असल्याचा आरोप व्यापाऱ्यांनी केला आहे. बामणी फाटा ही २० ते २५ गावांची प्रमुख बाजारपेठ असून विद्यार्थी, व्यापारी व नागरिकांना या वाहनांमुळे वाहतूक कोंडी आणि धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. हायवा टिप्पर रस्त्यावरच उभे करून चालक निघून जात असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे.
कंपनीने तात्काळ पाणी फवारणी करावी, रस्त्यावरील खड्डे बुजवावेत आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे. कंपनीच्या दुर्लक्षामुळे अखेर व्यापाऱ्यांना रास्ता रोको आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला.

# राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी बोरगाव तेलंग व माळ कौठा येथे कुटुंबीयांचे केले सांत्वन

## • मयत शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून सर्वतोपरी मदत मिळवून देणार

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नांदेड जिल्हा प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर**
नांदेड तालुक्यातील बोरगावतेलंग येथील मयत शेतकरी शंकर क्षीरसागर आणि मुदखेड तालुक्यातील माळकौठा येथील मयत शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या कुटुंबीयांची राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी आज भेट घेऊन सांत्वन केले.



शासन त्यांच्या पाठीशी असून, शासनाच्या विविध योजनांमधून पात्रतेनुसार लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.
बोरगाव तेलंग येथे कुटुंबीयांची आस्थेवाईकपणे विचारपूस राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी बोरगाव तेलंग येथे मयत शेतकरी शंकर क्षीरसागर यांच्या घरी भेट देऊन त्यांच्या पत्नी, आई, वडील व मुलींची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. कुटुंबीयांना धीर देत शासनाकडून आवश्यक मदत मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच शंकर क्षीरसागर यांच्या वडिलांवर आवश्यक उपचार करण्यासाठी संबंधित आरोग्य विभागाला निर्देश दिले.
माळकौठा येथे शिंदे कुटुंबीयांचे सांत्वन मुदखेड तालुक्यातील माळ कौठा येथे मयत शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या घरी भेट देऊन राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी त्यांच्या आई, पत्नी व मुलांची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. या कठीण प्रसंगी शासन त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी असून, विविध शासकीय योजनांचे पात्रतेनुसार लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी बोरगाव तेलंग येथे तहसीलदार संजय वारकड, गटविकास अधिकारी व संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. माळ कौठा येथे आमदार श्रीजया चव्हाण यांच्यासह तहसीलदार, गटविकास अधिकारी, संबंधित अधिकारी-कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

# रुटी तलावातील गाळ काढण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून देणार मंत्री नितेश राणे यांचे आश्वासन..

## मच्छीमारांच्या मागण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा- आ.सुरेश धस

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**आष्टी (अण्णासाहेब साबळे)**

दुष्काळाच्या संकटामुळे मत्स्यव्यवसायावर अवलंबून असलेल्या मच्छीमार बांधवांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, त्यांना पुन्हा स्वाभिमानाने व्यवसाय उभा करता यावा, यासाठी राज्य शासन सकारात्मक प्रयत्न करणार आहे. आष्टी तालुक्यातील रूटी तलावातील गाळ काढण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्यासह मच्छीमारांच्या विविध मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी ताकद लावणार असल्याची ग्वाही राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी दिली. आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून रूटी तलाव परिसरात आयोजित मच्छीमार बांधवांच्या संवाद बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार सुरेश धस यांनी तलावाचा ऐतिहासिक संदर्भ, गाळ साचल्यामुळे कमी झालेली जलसाठवण क्षमता, मत्स्यउत्पादनातील घट आणि मच्छीमारांच्या आर्थिक अडचणी याकडे शासनाचे लक्ष वेधले. या बैठकीला मत्स्यव्यवसाय विभागाचे आयुक्त, विभागीय व जिल्हास्तरीय अधिकारी, जलसंपदा विभागाचे अधिकारी, स्थानिक , मच्छीमार बांधव, महिला आणि नागरिक उपस्थित होते.

मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा; मच्छीमारांनाही मदतीचा अधिकार मंत्री नितेश राणे म्हणाले की, महाराष्ट्रात महायुती सरकारने मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. शेतकरी ज्या कष्टाने शेती करतो, त्याचप्रमाणे मच्छीमार बांधवही मेहनतीने मत्स्यव्यवसाय करून राज्याच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावतात. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी मदतीचे निर्णय घेतले जातात, त्यावेळी मच्छीमार बांधवांचाही विचार व्हायला हवा, ही सरकारची भूमिका आहे. दुष्काळ, अतिवृष्टी आणि नैसर्गिक संकटांमुळे मत्स्यव्यवसायाचे नुकसान झाल्यास मच्छीमारांना मदत मिळावी, या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ मच्छीमारांपर्यंत पोहोचविण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाच्या माध्यमातून काम केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मत्स्यबीज नष्ट झाल्याने पुढील हंगामाची चिंता यंदाच्या दुष्काळी परिस्थितीचा मत्स्यव्यवसायावर गंभीर परिणाम झाला आहे. अनेक तलावांतील पाणीसाठा कमी झाल्याने मत्स्यबीज नष्ट झाले असून, पुढील वर्षी व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक मत्स्यबीज उपलब्ध कसे करायचे, असा प्रश्न मच्छीमारांसमोर निर्माण झाला आहे. या परिस्थितीची शासनाने गांभीर्याने दखल घेतली असून, नुकसानग्रस्त मच्छीमारांना केवळ आर्थिक मदत देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांना पुन्हा व्यवसाय सुरू करता येईल, अशा स्वरूपाची मदत देण्याचा प्रयत्न असल्याचे राणे यांनी सांगितले. दुष्काळी परिस्थितीच्या आढाव्यात मत्स्यव्यवसायाचे नुकसान, तलावांतील पाणीसाठा आणि मत्स्यबीजाची स्थिती यांचाही समावेश करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मच्छीमारांना पुढील हंगामात पुन्हा सक्षमपणे व्यवसाय करता यावा, हा शासनाचा उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. गाळ काढण्यासाठी सीएसआर निधीची मदत घेणारत्रुटी तलावासह मराठवाड्यातील विविध तलावांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने पाणीसाठवण क्षमता कमी झाली आहे. तलावातील गाळ योग्य वेळी काढल्यास जलसाठा वाढण्यास आणि मत्स्यउत्पादनाला चालना मिळण्यास मदत होऊ शकते. याबाबत बोलताना मंत्री राणे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या चर्चेत दुष्काळी परिस्थितीत तलावांतील गाळ काढण्याचा कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता मांडली आहे. यासाठी उद्योगसमूहांच्या सामाजिक दायित्व निधीचा (सीएसआर) वापर करण्याची शक्यता तपासली जात आहे. गरजेनुसार संबंधित उद्योगसमूहांशी चर्चा करून निधी उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न केले जातील. आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण खांद्याला खांदा लावून काम करू, असे आश्वासनही त्यांनी दिले. आमदार सुरेश धस यांनी मांडला तलावाचा ऐतिहासिक संदर्भयावेळी आमदार सुरेश धस यांनी त्रुटी तलावाच्या निर्मितीचा ऐतिहासिक संदर्भ देत या प्रकल्पाला मोठे महत्त्व असल्याचे सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार, १९३६ मध्ये निजामकालीन काळात या तलावाच्या कामाची सुरुवात झाली होती. या तलावाच्या बुडीत क्षेत्रामुळे परिसरातील अनेक गावांचा संबंध या प्रकल्पाशी जोडला गेला आहे. तलावात मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्यामुळे जलसाठा कमी होत असून, त्याचा थेट परिणाम




मत्स्यव्यवसायावर होत आहे. त्यामुळे केवळ मत्स्यव्यवसाय विभागाच्या योजनांवर अवलंबून न राहता इतर शासकीय यंत्रणा आणि सीएसआर निधीच्या माध्यमातूनही गाळ काढण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी मागणी त्यांनी केली. मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत गाळ काढण्यासाठी प्रतिहेक्टर २ लाख ५० हजार रुपयांच्या तरतुदीचा संदर्भ देत, तलावाच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत आवश्यक निधी मोठा असल्याचे धस यांनी निदर्शनास आणून दिले. त्यामुळे या तलावासाठी विशेष बाब म्हणून स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मच्छीमारांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाहीआमदार धस यांनी मच्छीमार बांधवांच्या मागण्यांचा विचार करून त्यांना न्याय देण्याचे आवाहन मंत्री राणे यांना केले. तलावात पुरेसा पाणीसाठा राहिला तरच मत्स्यबीजाची वाढ होऊन चांगले उत्पादन मिळू शकते. अन्यथा कमी पाण्यामुळे मासे वाढण्यापूर्वीच मत्स्यव्यवसाय अडचणीत येतो, अशी वस्तुस्थिती त्यांनी मांडली. यावर उत्तर देताना मंत्री नितेश राणे म्हणाले की, मच्छीमारांनी मांडलेल्या मागण्या मंत्रालय स्तरावर नेऊन त्यावर सकारात्मकरीत्या तोडगा काढण्यासाठी प्रयत्न केले जातील. मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेसह विविध योजनांच्या माध्यमातून मच्छीमारांना मदत देण्याबाबत शासन प्रयत्न करेल. मच्छीमारांच्या सुविधांसाठी मत्स्यविक्री केंद्र उभारण्याच्या प्रस्तावाचाही उल्लेख करत, संबंधित प्रस्तावावर काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात आष्टी तालुक्यात आल्यानंतर या कामाच्या भूमिपूजनासाठी येण्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. अंत्योदयातील वंचित घटकांना न्याय देण्याची गरजआमदार सुरेश धस यांनी आपल्या भाषणात भिल्ल, कहार, वडार आणि पारधी समाजासह वंचित घटकांच्या आर्थिक परिस्थितीचा उल्लेख केला. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या अंत्योदयाच्या विचारानुस समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाचा लाभ पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मत्स्यव्यवसायावर अवलंबून असलेल्या गरीब कुटुंबांना रोजगाराची शाश्वती मिळावी, त्यांच्या मुलांचे भविष्य सुरक्षित व्हावे आणि दुष्काळामुळे उद्ध्वस्त झालेला व्यवसाय पुन्हा उभा राहावा, यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मच्छीमारांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याचे आश्वासन त्रुटी तलावातील गाळ काढणे, पाणीसाठवण क्षमता वाढविणे, मत्स्यबीज उपलब्ध करून देणे, नुकसानग्रस्त मच्छीमारांना मदत मिळवून देणे आणि मत्स्यव्यवसायाला पूरक सुविधा उपलब्ध करणे या प्रमुख मुद्द्यांवर बैठकीत चर्चा झाली. मच्छीमारांना केवळ आश्वासने न देता त्यांना पुन्हा व्यवसायाच्या माध्यमातून उभे करण्यासाठी शासन प्रयत्न करेल, असा विश्वास मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला. आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून झालेल्या या बैठकीमुळे रूटी तलावाच्या विकासासह मच्छीमार बांधवांच्या प्रश्नांकडे शासनाचकाढण्यासाठी निधी, मत्स्यबीज आणि नुकसानभरपाईसंदर्भातील मागण्यांवर प्रत्यक्ष शासन निर्णय व निधी मंजुरी होणे अपेक्षित आहे. बैठकीतील आश्वासनांची अंमलबजावणी झाल्यानंतरच मच्छीमारांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळू शकेल.यावेळी मत्स्य व्यावसायिक अमोल जगदाळे, शेतकरी महादेव पडोळे यांची समोचीत भाषणे झाली.यावेळी मत्स्यआयुक्त श्री. भानुदास पालवे,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,शिरूर नगराध्यक्ष रोहिदास गाडे पाटोदा नगराध्यक्ष राजेंद्र जाधव यांच्यासह संबंधित अधिकारी, नगरसेवक,सरपंच,कार्यकर्ते, शेतकरी, मत्स्यव्यवसायिक आणि मच्छीमार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनवट येथील शिवाजी नगर रेल्वे गेट अंडरपासचे काम रखडले




**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**किनवट तालुका प्रतिनिधी शेख शौकत**

किनवट येथून मांडवा (कि.), नागझरी आणि झेंडीगुडा परिसरातील २० ते २५ आदिवासी गावांना जोडणाऱ्या 'एमडीआर-७' या मुख्य मार्गावरील शिवाजी नगर रेल्वे गेटच्या अंडरपासचे काम स्थानिक रखडल्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. सध्या अत्यंत अरुंद पुलाखालून वाहतूक सुरू असून शेजारील ४ मीटर रुंदीच्या दुहेरी अंडरपासचे काम पूर्णपणे ठप्प पडल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे.

प्रारंभी रेल्वे प्रशासनाकडून केवळ ३ मीटर रुंदीचा पूल तयार करण्यात येत होता. मात्र, यामुळे रुग्णवाहिका व मोठ्या वाहनांची जाण्या-येण्याची मोठी गैरसोय होईल, ही बाब लक्षात घेऊन आमदार भीमराव केराम यांनी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाकडे दाद मागितली होती. आयोगाच्या हस्तक्षेपानंतर आणि आमदारांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे १२ कोटी २८ लाख रुपयांच्या ५ मीटर रुंदीच्या दुहेरी पुलाच्या कामाला मंजुरी मिळाली होती. मात्र, आता प्रशासनाच्या संथ कारभारामुळे हे महत्त्वपूर्ण काम रखडले आहे.

दरम्यान, ३ मीटर रुंदीच्या जुन्या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने परिसरात प्रचंड धुळीचे साम्राज्य निर्माण झाले होते. यावर नगराध्यक्षा सुजाता एन्ड्रलवार यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला धारेवर धरल्यानंतर कंत्राटदाराला नव्याने डांबरीकरण करावे लागले होते.

आता पुन्हा प्रत्यक्ष काम मंदावल्याने परिसरात वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. दैनंदिन प्रवाशांचा होणारा खोळंबा आणि टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने तातडीने या अंडरपासचे काम पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# अनंतराव भालेराव यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून अन्यायाविरुद्ध आवाज उठवला -- प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**त्रिसिंग जायभाये**

पाचोड ---- शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात हैदराबाद मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक, निर्भीड पत्रकार आणि विचारवंत अनंतराव भालेराव यांचा ३५ वा स्मृतिदिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व अनंतराव भालेराव यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. ह. सो. बिडवे उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे होते.यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. ह. सो. बिडवे म्हणाले की, "स्वातंत्र्यासाठी लढणारे धैर्य, सत्यासाठी झिजणारी लेखणी आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची




प्रेरणा देणारी स्मृती म्हणजे अनंतराव भालेराव होय." अनंतराव भालेराव यांनी आपल्या निर्भीड पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील अन्यायकारक प्रवृत्तींना वाचा फोडली. सत्याची बाजू ठामपणे मांडत त्यांनी सामान्य जनतेच्या प्रश्नांना आपल्या लेखणीतून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्याचे माध्यम नसून समाजाला जागृत करण्याचे आणि लोकशाही मूल्यांचे संवर्धन करण्याचे प्रभावी साधन आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले. त्यांच्या विचारांतून आजच्या पत्रकारितेलाही सत्यनिष्ठा, निर्भीडपणा आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा मिळते, असे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे म्हणाले की, अनंतराव भालेराव यांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होत त्यांनी जनतेमध्ये स्वातंत्र्याची जाणीव निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवला आणि सर्वसामान्य जनतेच्या समस्या प्रभावीपणे मांडल्या. त्यांच्या लेखणीतून सामान्य माणसाचा आवाज बुलंद झाला आणि समाजामध्ये नवचैतन्य निर्माण झाले. त्यांचे जीवनकार्य हे सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी प्रेरणादायी आहे. सत्य, निर्भीडपणा आणि समाजहित या मूल्यांचा अंगीकार करून त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असेही त्यांनी सांगितले.अनंतराव भालेराव यांचे कार्य आणि विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी सामाजिक प्रश्नांविषयी संवेदनशील राहावे, तसेच सत्य आणि न्यायाच्या बाजूने उभे राहण्याची भूमिका स्वीकारावी, असा संदेश या स्मृतिदिनाच्या कार्यक्रमातून देण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद कांबळे यांनी केले, तर आभार डॉ. हेमंत कुमार जैन यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हदगाव तहसील कार्यालयात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी

## भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक कारभारासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांची सामूहिक प्रतिज्ञा

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**हदगांव । चंद्रकांत भोरे**

हदगाव तहसील कार्यालयात महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच शासकीय कामकाजात प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि नैतिक मूल्यांचे पालन करून नागरिकांना भ्रष्टाचारमुक्त सेवा देण्याची सामूहिक प्रतिज्ञा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली.



कार्यक्रमाच्या प्रारंभी महर्षी वाल्मिकी यांच्या जीवनकार्याचा आणि महान विचारांचा परिचय करून देण्यात आला. त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेत शासकीय सेवेत प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि जनसेवेची भावना जोपासण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन कामकाजात पारदर्शकता राखणे, नागरिकांना वेळेत सेवा उपलब्ध करून देणे आणि कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराला थारा न देणे, याबाबत आपली बांधिलकी व्यक्त केली.

या कार्यक्रमास नायब तहसीलदार श्री.तामसकर यांच्यासह तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी आणि शिपाई उपस्थित होते.

लोकाभिमुख प्रशासनाचा संदेश

शासकीय कार्यालयांमधून सर्वसामान्य नागरिकांना पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख सेवा मिळणे ही काळाची गरज आहे. नागरिकांचा शासकीय यंत्रणेवरील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी प्रामाणिक आणि जबाबदार कारभार महत्त्वाचा आहे. महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या या प्रतिज्ञेतून भ्रष्टाचारमुक्त प्रशासन आणि जनसेवेचा संदेश देण्यात आला.

# पत्रकार जीवन व्यंकटराव जाधव यांना छावा पुरस्कार जाहीर;.... 1 नोव्हेंबरला पंढरपुरात होणार सन्मान.....

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**जीवन जाधव औसा.**

औसा : गेल्या दहा वर्षापासून पत्रकार क्षेत्रात सातत्यपूर्ण जनसेवा व निर्भीड लेखणीच्या माध्यमातून अनेक शेतकरी व सर्वसामान्य व सर्व घटकातील लोकांचे प्रश्न सरकार दरबारी मांडत आपल्या लेखणीच्या माध्यमातून अनेकांच्या समस्या प्रशासन दरबारी मांडून लोकांचे प्रश्न मार्गी लावल्याने व पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत पत्रकार जीवन जाधव यांना अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेच्या वतीने छावा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारामुळे औसा तालुक्यासह पत्रकारिता क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र प्रवक्ता प्रवीण घाडगे-पाटील यांनी पत्रकार जीवन जाधव यांना पत्राद्वारे पुरस्कार जाहीर झाल्याची माहिती दिली आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून जनसामान्यांचे प्रश्न, सामाजिक समस्या आणि अन्यायाला वाचा फोडण्याच्या कार्याची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता, पंढरपूर येथील योग भवन, एलआयसी ऑफिसजवळ हा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी पत्रकार जीवन जाधव यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

पत्रकारिता क्षेत्रातील कार्याचा गौरव करणारा हा सन्मान त्यांच्या पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पत्रकार जीवन जाधव यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे...या भव्य शेतकरी मेळावा छावा पुरस्कार सोहळ्यासाठी पुढील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे ह भ प रविगिरी लवटे महाराज. पंढरपूर देवस्थान समिती सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर जगळगावकर महाराज.




ह.भ.प. वास्कर महाराज ह भ प कांतिलाल सरीक महाराज... छावा प्रदेश अध्यक्ष तथा शेतकरी नेते विजय भैया घाडगे पाटील , हिंदु रक्षक धवलसिंह मोहीते पाटील , माढा लोकसभा शिवसेना संपर्क प्रमुख पै.चंद्रहार दादा पाटील , राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख, प्रेरणा कट्टे अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर,, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे पोलीस निरीक्षक पंढरपूर महेश ढवान, पंढरपूर नगराध्यक्ष प्रणिता ताई भालके, पोलीस निरीक्षक सुरेश किल्लावार , नगरसेवक तथा ज्येष्ठ नेते नागेश काका भोसले, जिल्हा परिषद सदस्य संगीताताई मोठे,, जिल्हा परिषद सदस्य अतुल (मालक )पवार,, जिल्हा परिषद सदस्य चरण राज चौरे,, नगरसेवक आदित्य फत्तेपुरकर नगरसेवक ओंकार जोशी,, पश्चिम महाराष्ट्र जिल्हाध्यक्ष महिला आघाडी महालक्ष्मी सगर, महिला जिल्हाध्यक्ष गितांजली कदम , अखिल भारतीय छावा संघटनेचे मार्गदर्शक सागर दादा कदम,सोलापुर जिल्हाध्यक्ष नागेश गायकवाड ,सोलापुर जिल्हाध्यक्ष आमोल पाटील ,सोलापुर जिल्हा कार्याध्यक्ष विजय सगर ,सोलापुर युवक जिल्हाध्यक्ष सुदर्शन गायकवाड , अखिल भारतीय छावा संघटना पश्चिम महाराष्ट्र प्रवक्ता प्रवीण घाडगे पाटील सह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत अखिल भारतीय छावा संघटना आयोजित भव्य शेतकरी मेळावा छावा पुरस्कार सोहळा व संघटनात्मक आढावा बैठक पंढरपूर येथे होणार आहे,,,

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)